**प्रेसनोट** **दि.२६/०३/२०१९**

## मुंढवा पोलीस ठाणे, पुणे शहर

## मिसिंग मुलगी वय ३ वर्ष हिचा शोध घेवून तात्काळ पालकांच्या ताब्यात

दि.२३/०३/२०१९ रोजी मुंढवा पोलीस स्टेशन कडील पोउपनि घाटगे, पो.हवा. वाघ, पो.हवा. शिवरकर, पो.ना भोसले व पोना. ढोंबरे हे शिवजयंती बंदोबस्ताचे अनुषंगाने केशवनगर भागात पेट्रोलिंग करीत असताना मुलगी नामे अनन्या, वय ३ वर्षे हि शिवाजी चौक, केशवनगर येथे एकटीच रस्त्याचे कडेने रडत रडत भटकत असताना मिळुन आल्याने नमूद अधिकारी व कर्मचारी यांनी त्या मुलीस त्याचे आई वडीलांबाबत विचारपूस केली असता, सदर मुलीस आई वडील व राहते ठिकाणाबाबत माहिती देता येत नसल्याने नमूद अधिकारी व कर्मचारी यांनी तिचे पेहराव व बोली भाषेवरुन ती लेबर कॅम्पमधील असल्याचा अंदाज लावून तात्काळ लोणकरवस्ती, साडेसतरानळी भागातील लेबर कॅम्पमध्ये तपास केला असता, काहीएक माहिती मिळाली नाही व शेवटी गायराणवस्ती भागातील गोदरेज साईटवरील लेबर कॅम्पमध्ये तपास करता तिचे आई वडीलांबाबत माहिती मिळाल्याने व तिचे पालकही सदर मुलीचाच शोध घेत असल्याने त्यांना केशवनगर पोलीस चौकीस बोलावून व पुर्ण खात्री करुनच मुलगीस तिचे वडील जितेंद्र विनोद चंद्रबन्सी, रा. लेबर कॅम्प, गायराणवस्ती, केशवनगर यांचे ताब्यात सुखरुप दिले नंतर नमूद मुलीचे पालकांनी पोलीसांचे आभार मानले.

